# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** शासनाकडुन शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये शासकीय स्थानिक
**{शिक्षण विभाग}** स्वराज्य संस्थाच्या इयत्ता १ ते ८ मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांकरिता मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येत आहे. यावर्षी पासुन मोफत गणवेश योजनेत लाभार्थी विद्यार्थ्यांना थेट गणवेश शासनामार्फत देण्यात येत आहेत. महाराष्ट्र 'प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र क्र. जा.क्र. मप्राशिप/समग्र शिक्षा/गणवेश/२०२३-२४/१५२५. दि. २९.०५.२०२३ अन्वये लाभार्थ्यांना प्रती गणवेश रू. ३००/- या दराने दोन संच गणवेशाकरीता रू. ६००/- प्रती लाभार्थी याप्रमाणे मंजूर करण्यात आले होते. तसेच लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून गणवेश उपलब्ध करून देण्याकरीता निर्देशित आहे. शासनाद्वारा गणवेश प्राप्त न होणा-या बालवाडीतील सर्व विद्यार्थी व इयत्ता ९ वी ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा खर्च दरवर्षी महानगरपालिकेद्वारा वहन केला जातो. यामुळे शासनामार्फत मागील वर्षी निश्चित केलेल्या दरावर व शासनाने निश्चित केलेल्या गणवेशाच्या मापदंडाप्रमाणे इयत्ता बालवाडीतील सर्व विद्यार्थी व इयत्ता ९ वी ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आकडेवाडीनुसार खालील प्रमाणे उल्लेखीत पदशीर्षा अंतर्गत हा खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

| महानगरपालिकेद्वारा गणवेश द्यावयाचे विद्यार्थी | विद्यार्थी संख्या | प्रस्तावति दर | आवश्यक रक्कम | खर्चाचा पदशीर्ष |
|---|---|---|---|---|
| पूर्वप्राथमिक विद्यार्थी | १६०८ | ६०० | ९६४८०० | A25002020705 (विद्यार्थांना गणवेश) |
| माध्यमिक शाळांतील इयत्ता 9 ते 12 मधील मुक्त संवर्गातील मुले | ११६७ | ६०० | ७००२०० | |
| माध्यमिक शाळांतील इयत्ता 9 ते 12 मधील मुली | १४९८ | ६०० | ८९८८०० | A277002441601 (महिला व बाल कल्याण विकास पदशीर्ष) समाज विकास विभाग |
| इयत्ता 9 ते 12 मधील अनुसुचित जाती व जमाती मुले | २२९ | ६०० | १३७४०० | A27402020702 (विद्यार्थांना गणवेश (दुर्बल घटक) |
| एकंदर | ४५०२ | ६०० | २७०१२०० | |

शासनाव्दारा इयता १ ते ८ करीता मागील वर्षी निश्चित केलेल्या रू.६००/- प्रति विद्यार्थी 2 जोडी गणवेश या दरास कायम ठेवून म.न.पा. निधीतुन दयावयाच्या गणवेशाकरीता शाळास्तरावर खरेदी करण्याची प्रक्रीया पूर्ण करून विद्यार्थ्यांना संपूर्ण २ जोडी गणवेश प्राप्त झाल्याबाबतचे विद्यार्थी संख्येसह उपयोगिता प्रमाणपत्र शाळांद्वारा सादर केल्यानंतर

मागणीपत्र/उपयोगीता प्रमाणपत्राचे आधारे गणवेश निधी शाळांना वर्ग करण्यात येईल. इयत्ता ९ वी ते १२ वी व पुर्वप्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड प्रशिक्षणाबाबत सूचना नसल्यामुळे या विद्यार्थांना स्काऊट गाईड गणवेश न देता शासनाने निश्‍चित केलेला नियमित गणवेशच दोन्ही गणवेशाकरिता देण्यात येईल. म.न.पा. द्वारा देण्यात येणा-या गणवेशाचा निधी तक्त्यात दर्शविलेल्या पदशीर्षांतर्गत खर्च करण्यात येईल. महानगरपालिकेद्वारा दयावयाच्या शालेय गणवेशास रू २७०१२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्ष विद्यार्थी दाखल संख्येप्रमाणे खर्च कमी/जास्त होवू शकेल.

सबब ठराव मान्यतेस्तव सादर.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 1054/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 23/09/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार शासनाकडुन शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थाच्या इयत्ता १ ते ८ मध्ये शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांकरिता मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येत आहे. यावर्षी पासुन मोफत गणवेश योजनेत लाभार्थी विद्यार्थ्यांना थेट गणवेश शासनामार्फत देण्यात येत आहेत. महाराष्ट्र 'प्राथमिक शिक्षण परिषद यांचे पत्र क्र. जा.क्र. मप्राशिप/समग्र शिक्षा/गणवेश/२०२३-२४/१५२५. दि. २९.०५.२०२३ अन्वये लाभार्थ्यांना प्रती गणवेश रू. ३००/- या दराने दोन संच गणवेशाकरीता रू. ६००/- प्रती लाभार्थी याप्रमाणे मंजूर करण्यात आले होते. तसेच लाभार्थी विद्यार्थ्यांना शाळा व्यवस्थापन समिती स्तरावरून गणवेश उपलब्ध करून देण्याकरीता निर्देशित आहे. शासनाद्वारा गणवेश प्राप्त न होणा-या बालवाडीतील सर्व विद्यार्थी व इयत्ता ९ वी ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा खर्च दरवर्षी महानगरपालिकेद्वारा वहन केला जातो. यामुळे शासनामार्फत मागील वर्षी निश्‍चित केलेल्या दरावर व शासनाने निश्‍चित केलेल्या गणवेशाच्या मापदंडाप्रमाणे इयत्ता बालवाडीतील सर्व विद्यार्थी व इयत्ता ९ वी ते १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आकडेवाडीनुसार खालील प्रमाणे उल्लेखीत पदशीर्षा अंतर्गत हा खर्च करण्याचे प्रस्तावित आहे.

| **महानगरपालिकेद्वारा गणवेश द्यावयाचे विद्यार्थी** | **विद्यार्थी संख्या** | **प्रस्तावति दर** | **आवश्यक रक्कम** | **खर्चाचा पदशीर्ष** |
|---|---|---|---|---|
| पूर्वप्राथमिक विद्यार्थी | १६०८ | ६०० | ९६४८०० | A25002020705 (विद्यार्थांना गणवेश) |
| माध्यमिक शाळांतील इयत्ता 9 ते 12 मधील मुक्त संवर्गातील मुले | ११६७ | ६०० | ७००२०० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| माध्यमिक शाळांतील इयत्ता 9 ते 12 मधील मुली | १४९८ | ६०० | ८९८८०० | A277002441601 (महिला व बाल कल्याण विकास पदशीर्ष) समाज विकास विभाग |
| इयत्ता 9 ते 12 मधील अनुसुचित जाती व जमाती मुले | २२९ | ६०० | १३७४०० | A27402020702 (विद्यार्थांना गणवेश (दुर्बल घटक) |
| एकंदर | ४५०२ | ६०० | २७०१२०० | |

शासनाव्दारा इयता १ ते ८ करीता मागील वर्षी निश्चित केलेल्या रू.६००/- प्रति विद्यार्थी 2 जोडी गणवेश या दरास कायम ठेवून म.न.पा. निधीतुन दयावयाच्या गणवेशाकरीता शाळास्तरावर खरेदी करण्याची प्रक्रीया पूर्ण करून विद्यार्थ्यांना संपूर्ण २ जोडी गणवेश प्राप्त झाल्याबाबतचे विद्यार्थी संख्येसह उपयोगिता प्रमाणपत्र शाळांद्वारा सादर केल्यानंतर मागणीपत्र/उपयोगीता प्रमाणपत्राचे आधारे गणवेश निधी शाळांना वर्ग करण्यात येईल. इयत्ता ९ वी ते १२ वी व पुर्वप्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना स्काऊट गाईड प्रशिक्षणाबाबत सूचना नसल्यामुळे या विद्यार्थांना स्काऊट गाईड गणवेश न देता शासनाने निश्चित केलेला नियमित गणवेशच दोन्ही गणवेशाकरिता देण्यात येईल. म.न.पा. द्वारा देण्यात येणा-या गणवेशाचा निधी तक्त्यात दर्शविलेल्या पदशीर्षांतर्गत खर्च करण्यात येईल. महानगरपालिकेद्वारा दयावयाच्या शालेय गणवेशास रू २७०१२००/- इतका खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्ष विद्यार्थी दाखल संख्येप्रमाणे खर्च कमी/जास्त होवू शकेल.

वरील प्रमाणे प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजूरी प्रदान केली.